CBSE Affiliated

List of Documents to be sub...

# महाराष्ट्र शासन

## विभागीय शिक्षण उपसंचालक मुंबई यांचे कार्यालय

नेताजी सुभाष रोड, जवाहर बालभवन, चर्नी रोड ( प ) मुंबई -४०० ००४

दुरध्वनी क्रमांक- ०२२-२३६३००८१/८६ ईमेल- **dydemumbai@yahoo.com**

---

क्र.शिउसं/माध्य-३/दुबार सत्र/२०२४/ 1761

दिनांक :- 23 FEB 2024

प्रति,

प्राचार्य,
द मॉडर्न स्कूल, सिक्का नगर,
विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई – ४०० ००४

**विषय :-** **दुबार सत्रामध्ये शाळा चालविण्यास परवानगी मिळणेबाबत** .
मॉडर्न स्कूल सिक्का नगर, मुंबई

**संदर्भ :-** आपला दि.२०.०२.२०२४ रोजीचा प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपल्या **दि मॉडर्न स्कूल (इंग्रजी माध्यम) व्ही.पी.रोड, सिक्का नगर, मुंबई** या इंग्रजी माध्यमाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या प्राथमिक ते माध्यमिक (इ. १ ली ते १० वी) शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्याच्या हेतुने शाळा दोन सत्रांमध्ये चालविण्यासाठी आपणांकडून या कार्यालयाकडे विनंती करण्यात आली आहे.

प्रस्तूत प्रकरणी माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.५५.१ नुसार शाळेच्या जागेची अडचण दूर करण्यासाठी समुचित प्राधिकाऱ्यांनी शाळांची निकड म्हणून त्यांना दोन पाळ्यांत काम करण्याची परवानगी देण्याची तरतूद आहे. मात्र, अशा शाळेत प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ शकणारी व अशा पध्दतीने काम करणारी त्याच प्रकारची इतर कोणतीही शाळा त्या वस्तीत नसली पाहीजे. तसेच माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.५५.३ (अ), (ब), (क) व (ड) प्रमाणे वस्तुस्थिती असल्यास सदर शाळेस त्यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शाळा दोन पाळ्यांमध्ये भरविता येईल, अशी तरतूद आहे.

त्या अनुषंगाने सदर शाळा दोन सत्र/पाळयामध्ये सुरु करण्यासाठी शाळेने उक्त नमूद अटींखेरीज बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २०११ मधील सर्व तरतूदींचे पालन करण्याच्या अटी/शर्तींच्या अधीन राहून पुढील योग्य ती कार्यवाही करावी. सदर बाबत कोणत्याही शिक्षक, विद्यार्थी वा पालक यांच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. उक्तप्रमाणे नमूद केलेल्या कोणत्याही नियमाचे शाळेने उल्लंघन केल्यास सदर आदेश तात्काळ प्रभावाने रद्द समजण्यात येतील याची नोंद घ्यावी.

( संदीप संगवे )
विभागीय शिक्षण उपसंचालक
मुंबई.

प्रत माहितीस्तव :-
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण विभाग, परेल, मुंबई